# अर्थशास्त्र
## बी.ए. तृतीय वर्ष (सेमिस्टर VI)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## लिंगाधारीत अंदाजपत्रक
## (Gender Budgeting)

प्रत्येक विकासाचा केंद्रबिंदू मानव असतो हा विचार आता सर्वमान्य झालेला आहे. अशा या विकासातून माणसाचे कल्याण जर झाले नाही तर ती प्रगती, विकास अर्थशून्य ठरते. आर्थिक विकासामुळे मानवाचे कल्याण साधले गेले तरच आर्थिक प्रगती खऱ्या अर्थाने फलदायी झाली असे मानता येईल.

आजच्या या स्पर्धेच्या युगात पुरुषांबरोबर महिला सुद्धा अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहभागी झालेल्या आहेत. परंतु रुढी, परंपरा यांच्या प्रभावामुळे समाजाची मानसिकता अशी आहे की वंशाला दिवा पाहिजे ही असल्यामुळे देशात लिंग भेदाची दरी निर्माण झाली आहे. त्यामुळे आजच्या या सुसंस्कृत आणि संपन्न समाजात देखील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळत नाही.

गेल्या चार पाच दशकांमध्ये विकासाच्या संकल्पनेत झालेले परिवर्तन म्हणजे मानव विकास संकल्पना होय. या संकल्पनेत लोकसंख्येच्या गुणवत्ता या पैलुंवर अधिक भर देण्यात आला आणि त्यातूनच महिलांच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे ही संकल्पना पुढे आली.

वर्तमान काळात (जेंडर बजेटींग) लिंगभाव विरहित अर्थसंकल्पना भारतातच नाही तर जगात महिला सक्षमीकरण आणि आर्थिक सुरक्षेचे एक साधन झाले आहे. लिंग आधारित अर्थसंकल्पाचा अर्थ महिलांकरिता वेगळी तरतूद करणे नसून सार्वजनिक खर्चात व उत्पन्नात प्राधान्य देणे हा आहे.

## जेंडर बजेटींगचा अर्थ

### (Meaning of Gender Budgeting)

स्त्रियांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प किंवा अर्थसंकल्पामध्ये स्त्रियांसाठी विशिष्ट तरतूद असा नसून संपूर्ण अर्थसंकल्पीय प्रक्रियेमध्ये लिंग समानता, स्त्री प्रश्नांची संवेदनशीलता व जाणीव यांचा अंतर्भाव करुन उत्पन्न व खर्चाच्या बाजूने त्यांची अंमलबजावणी करणे असा व्यापक अर्थ आहे. जेंडर बजेट म्हणजे केवळ प्रशासकीय प्रक्रिया मजबूत करणे आणि महिलांचा दर्जा उंचावण्यासाठी अंदाजपत्रकात उद्दिष्टे निश्चित करणे नव्हे. तर जे स्त्रोत महिलांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे त्यांची योग्य पाहणी करणे, त्याच्या परिणामांचे मूल्यमापन आणि स्त्रोत वाटपांची पुनर्रचना यांचाही समावेश होते.

## जेंडर बजेटिंगचा उद्देश

देशातील महिला आणि मुली यांचा सर्वांगिण विकास साधला जावा व त्यांना सुरक्षितता मिळावी या दृष्टीकोनातून जेंडर बजेटिंगची ही संकल्पना समोर आली. जेंडर बजेटिंगचा उद्देश महिला हा समाजातील महत्वाचा घटक आहे. हे विचारात घेऊन समाजाचा सर्वांगिण विकास करण्याच्या उद्देशाने न्याय, भेदभाव विरहीत, जाणीवपूर्वक कार्यपद्धतींचा निरंतर अंगीकार केला जावा हा या जेंडर बजेटिंग संकल्पनेचा उद्देश आहे. निरनिराळ्या शासकीय योजना आणि कार्यक्रम यासाठी निधीची तरतुद करीत असतांना त्या योजनेच्या

अंमलबजावणीतून महिला व मुली यांचा देखील विकास साधला जावा या उद्देशाने या संकल्पनेची मान्यता व अंमलबजावणी व्हावी हा उद्देश आहे.

त्याचप्रमाणे अर्थसंकल्पीय धोरणांचे मूल्यमापन हे महिलांच्या दृष्टीकोनातून करणे, 'लिंग समानता' या तत्वाचे अर्थसंकल्पातून योग्य स्पष्टीकरण करणे. लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्पाद्वारे स्त्री लिंग समानता केंद्रस्थानी येते. त्यातून स्त्रीयांच्या समस्या व प्रश्नाबाबत सरकार कार्यक्षम धोरणे तयार करु शकते हा उद्देश

## जेंडर बजेटिंगची सुरुवात

प्राथमिक स्तरावर प्रथमत: ऑस्ट्रेलियामध्ये सन १९८४ मध्ये लिंग आधारित बजेट प्रस्तुत करण्यात आले होते. त्यानंतर मात्र सन १९८९ पासून ब्रिटनमध्ये लिंग आधारित बजेटचा उपयोग केल्या जात आहे. आज जगातील बऱ्याच देशात लिंग आधारित बजेटचा उपयोग केल्या जात आहे.

भारतात २३ ते २४ नोव्हेंबर २००५ मध्ये राज्यांकरिता जेंडर बजेटिंगच्या संदर्भात जी कार्यशाळा आयोजित केली होती त्यात महिला आणि बालविकास विभागातील सचिव तसेच सर्व राज्यांच्या वित्त सचिवांचा अंर्तभाव होता. या कार्यशाळेत जेंडर बजेटिंगची भूमिका मांडण्यात आली. भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी २००५ मध्ये राष्ट्रीय विकास परिषदेच्या सभेत जेंडर बजेटिंगच्या संदर्भात असे म्हटले की, महिला आणि पुरुषांच्यामध्ये उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, पोषण व राहणीमान यात जे अंतर आहे, जी तफावत आहे ती दूर करण्याचे जेंडर बजेटिंग एक साधन आहे आणि हे साधन राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि स्थानिक पातळीतील महिलांचा अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रात सहभाग वाढविण्यात आणि निर्णय घेण्यात मदत करेल. पी. चिदंम्बरम यांनी २००६-०७ मध्ये स्त्री विकासाभिमूख अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न केला.

## जेंडर बजेटिंगची आवश्यकता

२०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येशी महिलांच्या लोकसंख्येची असणारी टक्केवारी ४८.४७ टक्के आहे. सुसंस्कृत आणि संपन्न समाजात देखील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळत नाही. मागास आणि दारिद्री देशात अतिकष्टाची कामे, कुपोषण, गरोदर अथवा प्रसुती वेळी स्त्रियांचे योग्य पोषण व औषधोपचार याकडे दुर्लक्ष होते. गेल्या एक दोन दशकातील आर्थिक क्षेत्रात अमलात आणलेल्या सुधारणा व सरकारची आर्थिक धोरणे पाहिल्यास असे दिसून येते की, देशात शिक्षण, आरोग्य, लिंगभेद प्रमाण इत्यादींचे निरीक्षण केल्यास पुरुषांच्या तुलनेत महिला वर्गाच्या बाबतीत प्रचंड असंतुलन ठेवून महिलांची अवहेलना करण्यात आली आहे. म्हणूनच स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, मानसिक उन्नतीसाठी स्त्रीचे खऱ्या अर्थाने सबलीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून स्त्री विकासाभिमूख अर्थसंकल्पाची नितांत आवश्यकता आहे.

## २०१८-१९ च्या केंद्रिय अंदाजपत्रकाची प्रमुख वैशिष्ट्ये

केंद्रिय अर्थमंत्री मा. अरुण जेटली यांनी २०१८-१९ च्या केंद्रिय अंदाजपत्रकात पुढील मुद्दे सांगितलेली आहेत.

१) मा. अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या २०१८-१९ च्या केंद्रिय अंदाजपत्रकाची प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शेती व ग्रामीण विभागाला मदत (सहाय्य) करणे.

२) आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या गरीब व दारिद्री लोकांना मदत करणे हे दुसरे वैशिष्ट्ये. अशा गरीब व दारिद्री लोकांसाठी आखलेल्या योजनांमध्ये प्रामुख्याने 'उज्वला योजना' व 'आरोग्य विमा योजना' या होत.

३) करांच्या संदर्भात मा. अर्थमंत्री म्हणाले, कराच्या सुधारणेमुळे व नवीन करप्रणालीमुळे व्यापारी वर्ग, पगारदार वर्ग व निवृती वेतन धारकांना दिलासा मिळाला.

४) सामाजिक सुरक्षिततेचे जाळे निर्माण करणे व त्यासाठी पर्याप्त संसाधनांची जुळवाजुळव करण्यासाठी १ टक्का जास्तीचा कर लावण्यात आला आहे.

५) LTCG (Long-term Capital gains) वरील करांच्या आकारणीच्या संदर्भात मा. अर्थमंत्री म्हणाले की, मोठ्या योजना यशस्वी करण्याकरिता पैशाची जास्त गरज असते त्यासाठी LTCG वर कर लावणे आवश्यक आहे.

६) निवडून आलेल्या सभासदांना देण्यात येणारे वेतन किंवा मानधन यासाठी संस्थात्मक यंत्रणा नेमण्याची सूचना अंदाजपत्रकात आहे.

७) टप्प्याटप्याने प्रत्येक अंदाजपत्रकात मा. अर्थमंत्री यांनी मध्यमवर्गीय करदात्याच्या हातात 'आधिक्य पैसा' (Surplus Money) ठेवला आहे.

८) २०१८-१९ करिता राजकोषीय तुटीचे जे लक्ष आहे ते साध्य करण्यासाठी सरकार निश्चिंत आहे.

९) पिकाची न्यूनतम हमी किंमत वाढविण्यासाठी निती आयोग एक यंत्रणा तयार करेल व ही हमी किंमत पिकाच्या उत्पादन व्ययापेक्षा १.५ म्हणजे दिडपट जास्त असेल. अर्थात या संदर्भात राज्याशी विचार विनिमय केला जाईल.

# अपेक्षित प्रश्न

## दिर्घोत्तरी प्रश्न

१) २०१८-१९ च्या केंद्रिय अंदाजपत्रकाची वैशिष्ट्ये सांगा.

२) जेंडर बजेट म्हणजे काय? ते सांगून त्याचा उद्देश व आवश्यकता स्पष्ट करा.

## लघुत्तरी प्रश्न

१) जेंडर बजेट म्हणजे काय?

२) जेंडर बजेट चे उद्देश सांगा.

३) जेंडर बजेट ची आवश्यकता स्पष्ट करा.